भाववाढ

प्र.२ ख़लील प्रशनंची एक ते दोन वाक्यत उत्तर लिहा

३.१ प्रस्तावना

***१. 'भाववाढ' ह्या संकल्पनेची व्याख्या लिहा.**

[मार्च १५]

उत्तर: i. 'भाववाढ' म्हणजे किमतींमध्ये वेगाने वाढ झाल्याने खरेदी क्षमतेत झालेली घट होय.

ii. प्रा. क्राऊथर यांच्या मते "भाववाढ म्हणजे अशी स्थिती, ज्यात पैशाचे मूल्य घटत जाते, कारण किमती वाढत असतात."

२. प्रा. क्राऊथर यांची व्याख्या कशात अपयशी ठरते?

उत्तर: प्रा. क्राऊथर यांची भाववाढीची व्याख्या ही 'किंमतपातळीत वाढ हे भाववाढीचे लक्षण आहे' यावर भर देते; परंतु वेळोवेळी किंमतपातळी का वाढते याचे स्पष्टीकरण देण्यात ही व्याख्या अपयशी ठरते.

३. प्रा. केम्मरर यांची भाववाढीची व्याख्या लिहा.

उत्तर: i. प्रा. केम्मरर यांच्या मते, "व्यवहारातील वस्तूच्या परिमाणापेक्षा पैशाचे परिमाण कितीतरी अधिक असणे म्हणजे भाववाढ होय."

ii. या व्याख्येत दोन गोष्टींची तुलना सामावलेली आहे. एका बाजूला पैशाचा पुरवठा आणि दुसऱ्या बाजूला भौतिक वस्तू व सेवांचा पुरवठा.

४. भाववाढीचे कारण व त्याचा परिणाम काय आहे?

उत्तर: पैशाच्या पुरवठ्यात वाढ हे भाववाढीचे कारण आहे. किंमतपातळीत वाढ हा भाववाढीचा परिणाम होय.

३.२ भाववाढीची कारणे

५. भाववाढीची मुख्य दोन कारणे कोणती?

[मार्च १४, जुलै १५]

उत्तर: भाववाढीची मुख्य दोन कारणे:

i. वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ

ii. तसेच, वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात घट

६. सार्वजनिक व खाजगी खर्चात वाढ झाल्याने काय परिणाम होतो?

उत्तर: i. सार्वजनिक व खाजगी खर्चात वाढ झाल्याने वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होते.

ii. उदा. युद्ध, विकासात्मक योजना इत्यादींमुळे सार्वजनिक खर्च वाढतो.

७. 'तुटीचा अर्थभरणा' ही संकल्पना स्पष्ट करा.

[मार्च १४, १६]

उत्तर: i. तूट भरून काढण्यासाठी सरकार जनतेकडून व रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेते. तसेच नोटांची छपाई करते. त्यामुळे पैशांचा पुरवठा वाढतो.

ii. यामुळे, मागणीत व किमतीत वाढ होते.

८. एकतर्फी उत्पादन हे भाववाढीला कसे कारणीभूत ठरते?

उत्तर: सुखसोयींच्या व चैनीच्या वस्तूंचे जास्त उत्पादन झाल्यामुळे बाजारातील अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा घटतो आणि भाववाढीस कारणीभूत ठरतो.

९. वस्तूंची साठेबाजी स्पष्ट करा.

उत्तर: i. जास्त नफा कमावण्यासाठी विक्रेते साठेबाजी करतात.

ii. त्यामुळे, विशिष्ट कालावधीत पुरवठा कमी होतो आणि भाववाढ होते.

३.३ भाववाढीचे परिणाम

१०. किंमतपातळी वाढल्यास सुरुवातीला काय होते?

उत्तर: i. किंमतपातळी वाढल्यास सुरुवातीला नफ्याचे प्रमाण, गुंतवणूक, उत्पादन, रोजगार पातळी आणि उत्पन्न वाढते.

ii. परंतु, यामुळे पैशांचे मूल्य कमी होते आणि खरेदी क्षमता घटते.

११. भाववाढीमुळे विदेशी भांडवलाचा प्रवाह का घटतो?

उत्तर: भाववाढीमुळे विदेशी भांडवलाचा प्रवाह घटतो, कारण उत्पादन खर्च वाढल्यामुळे विदेशी गुंतवणूक कमी फायदेशीर ठरते.

१२. भाववाढीमुळे संयोजक जास्त नफा कसा कमवतात?

उत्तर: i. भाववाढीमुळे उत्पादन खर्चापेक्षा विक्री किमती वेगाने वाढत असल्यामुळे संयोजक जास्त नफा कमवतात.

ii. जास्त नफा मिळवण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंऐवजी सुखसोयीच्या वस्तूंच्या उत्पादनाकडे साधने वळवली जातात.

१३. स्थिर उत्पन्न मिळवणाऱ्यांवर भाववाढीचा विपरीत परिणाम कसा होतो?

उत्तर: i. स्थिर उत्पन्न मिळवणाऱ्यांत निवृत्तिवेतनधारक, कामगार, पगारदार व्यक्ती इत्यादींचा समावेश होतो.

ii. यांवर भाववाढीचा विपरीत परिणाम होतो, कारण त्यांचे पैशातील उत्पन्न तेच राहते; परंतु पैशाचे मूल्य घसरते.

१४. ऋणकोंना भाववाढीचा फायदा का होतो?

उत्तर: ऋणकोंना भाववाढीचा फायदा होतो, कारण ते कर्जफेड करताना पूर्वीपेक्षा कमी खरेदीशक्ती परत करतात.

१५. धनकोंचे भाववाढीमुळे नुकसान का होते?

उत्तर: धनकोंचे भाववाढीमुळे नुकसान होते, कारण त्यांना वास्तव उत्पन्नाच्या स्वरूपात कमी उत्पन्न मिळते.

१६. भाववाढीच्या काळात मोठ्या शेतकऱ्यांचा फायदा का होतो?

उत्तर: भाववाढीच्या काळात मोठ्या शेतकऱ्यांचा फायदा होतो, कारण शेतमालाच्या किमती वाढतात.

१७. भाववाढीमुळे कुठल्या गटांतील लोकांना जास्त फायदा होतो?

उत्तर: भाववाढीमुळे पुढील गटांतील लोकांना जास्त फायदा होतो:

i. संयोजक

ii. समभागांमध्ये (शेअर्समध्ये) भांडवल गुंतवणूक करणारे

iii. ऋणको

iv. मोठे शेतकरी

१८. भाववाढीमुळे कुठल्या गटांतील लोकांवर विपरीत परिणाम होतो?

किंवा

भाववाढीमुळे कुठल्या गटांतील लोकांच्या पैशाचे नुकसान होते?

उत्तर: भाववाढीमुळे पुढील गटातील लोकांवर विपरीत परिणाम होतो:

i. स्थिर उत्पन्न मिळवणारे – निवृत्तिवेतनधारक, कामगार, पगारदार व्यक्ती.

ii. स्थिर उत्पन्नामध्ये गुंतवणूक करणारे – ठेवी आणि करार

iii. धनको

iv. छोटे शेतकरी

***१९. भाववाढीचा नैतिक मूल्यांवर कसा परिणाम होतो?**

उत्तर: i. भाववाढीमुळे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावते व सामाजिक संघर्ष उद्‌भवतो.

ii. भाववाढ झाल्यास काही उद्योजक भेसळ, साठेबाजी, गुणवत्तेची घसरण इ. गोष्टींचा आधार घेतात.

अशा प्रकारे, भाववाढीचा नैतिक मूल्यांवर परिणाम होतो.

३.४ भाववाढीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना

२०. *'बँक दर' म्हणजे काय?

किंवा

'बँक दर' म्हणजे काय ते स्पष्ट करा. [जुलै १५]

उत्तर: i. बँक दर म्हणजे व्यापारी बँकांना कर्जाऊ पैसे देताना मध्यवर्ती बँकांद्वारे आकारला जाणारा व्याजदर होय.

ii. बँक दरातील वाढ इतर व्याजदर वाढवते व लोकांना विविध वित्तसंस्थांकडून कर्ज घेण्याबाबत नाउमेद करते.

२१. बँका ग्राहकांच्या कर्जाचे व्यवस्थापन कसे करतात?

उत्तर: i. ग्राहकांच्या कर्जाचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यापारी बँका ग्राहकांना गाडी, दूरदर्शन अशा टिकाऊ वस्तू विकत घेण्यासाठी कर्ज देतात.

ii. पूर्वलक्षी भरणा करण्याच्या रकमेत वाढ करून आणि हप्त्यांची संख्या कमी करून अशा कर्जाचे नियंत्रण केले जाते.

२२. *'रोख निधी प्रमाण' म्हणजे काय?

[ऑक्टोबर १४, मार्च १५, १६]

किंवा

रोख निधींचे वाढते प्रमाण पैशांच्या पुरवठ्याला कसे नियंत्रण करते?

उत्तर: i. व्यापारी बँकांना त्यांच्या एकूण ठेवीपैकी जे प्रमाण मध्यवर्ती बँकेकडे ठेवावे लागते, त्यास रोख निधी प्रमाण म्हणतात.

ii. रोख निधीचे प्रमाण वाढवले, की बँकांकडून कमी कर्ज उपलब्ध होते. त्यामुळे पैशांचा पुरवठा नियंत्रणात राहण्यास मदत होते.

२३. सार्वजनिक कर्ज म्हणजे काय? [जुलै १६]

उत्तर: i. सरकार बाजार, खासगी व्यक्ती व संस्थांकडून कर्जाऊ रक्कम घेते.

ii. अशा प्रकारे, लोकांची अतिरिक्त खरेदी शक्ती काढून घेतल्यामुळे मागणी घटते व किमती कमी होतात.

यालाच सार्वजनिक कर्ज असे म्हणतात.

२४. भाववाढ नियंत्रणात का ठेवली पाहिजे?

उत्तर: भाववाढ नियंत्रणात ठेवली पाहिजे, कारण पूर्ण रोजगार पातळीनंतर भाववाढ धोकादायक ठरते.

प्र.३. पुढील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यांत उत्तरे द्या.

३.२ भाववाढीची कारणे

१. वस्तू व सेवा यांच्या वाढत्या मागणीची कारणे स्पष्ट करा.

किंवा

***वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ होण्यास कारणीभूत असलेले कोणतेही चार घटक लिहा.**

उत्तर: पुढील घटकांमुळे वस्तू व सेवा यांच्या मागणीत वाढ होते:

i. **सार्वजनिक व खाजगी खर्चात वाढ:**

युद्ध, विकासात्मक योजना इ. मुळे सार्वजनिक खर्चात वाढ होते. त्यामुळे वस्तू व सेवांची मागणी वाढते. खाजगी खर्च वाढल्यामुळेही वस्तू आणि सेवांची मागणी वाढते.

ii. **निर्यातीत वाढ:**

अ. निर्यात वाढल्याने देशातील उपभोगासाठी उपलब्ध असलेला वस्तूंचा साठा घटतो.

ब. यामुळे, अर्थव्यवस्थेत वस्तूंची टंचाई निर्माण होते, म्हणून पुरवठ्यापेक्षा मागणी अतिरिक्त होते.

iii. **करकपात:**

करांचे प्रमाण कमी झाल्यास उपभोक्त्यांची खरेदी क्षमता वाढते, म्हणून मागणीत वाढ होते.

iv. **लोकसंख्येत वेगाने वाढ:**

जेव्हा लोकसंख्या जलद गतीने वाढते, तेव्हा देशातील वस्तू आणि सेवांच्या मागणीची पातळी वाढते.

v. **तुटीचा अर्थभरणा:**

अ. तूट भरून काढण्यासाठी सरकार जनतेकडून व रिझर्व बँकेकडून कर्ज घेते. तसेच नोटांची छपाई करते.

ब. यामुळे, पैशांचा पुरवठा वाढतो आणि म्हणून मागणी व किमतीत वाढ होते.

vi. **कर्जाची उपलब्धता:**

सहजरीत्या कर्ज उपलब्ध झाल्यास उपभोक्त्यांच्या खर्चात वाढ होते, त्यामुळे वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ होते.

वरील सर्व घटक वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ होण्यास कारणीभूत ठरतात.

*२. **वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात घट होण्याची कारणे कोणती?** **[मार्च १५, १६]**

उत्तर: पुढील कारणांमुळे वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात घट निर्माण होते:

i. **उत्पादन घटकांची टंचाई:**
भूमी, श्रम, भांडवल यांसारख्या घटकांच्या कमतरतेमुळे उपभोग्य वस्तू व सेवांचे उत्पादन घटते. यामुळे पुरवठ्याची पातळी कमी होते.

ii. **औद्योगिक कलह:**
औद्योगिक कलहामुळे संप होतो. त्यामुळे टाळेबंदी होऊ शकते. अशा वेळी, औद्योगिक उत्पादन कमी होते व पुरवठा घटतो.

iii. **नैसर्गिक आपत्ती:**
पूर, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तींचा कृषी उत्पादन व कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होतो.

iv. **एकतर्फी उत्पादन:**
सुखसोयींच्या व चैनीच्या वस्तूंचे जास्त उत्पादन झाल्यामुळे बाजारातील अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा घटतो व भाववाढीस कारणीभूत ठरतो.

v. **वस्तूंची साठेबाजी:**
अ. जास्त नफा कमावण्यासाठी विक्रेते साठेबाजी करतात.
ब. त्यामुळे, विशिष्ट कालावधीत पुरवठा कमी होतो आणि भाववाढ होते.
क. भविष्यात किमती वाढतील या अपेक्षेने उपभोक्ते वस्तूंचा साठा करतात.
ड. त्यामुळे, बाजारात वस्तू व सेवांची कृत्रिम टंचाई निर्माण होते, म्हणून किमती वाढतात.

३.३ भाववाढीचे परिणाम

३. भाववाढीचे उत्पादनावरील परिणाम स्पष्ट करा.

उत्तर: i. भाववाढीचा कमी दर किंवा सौम्य भाववाढ आर्थिक वृद्धीसाठी प्रेरक ठरतो.

ii. किंमतपातळी वाढल्यास सुरुवातीला नफ्याचे प्रमाण, गुंतवणूक, उत्पादन, रोजगाराची पातळी आणि उत्पन्न वाढते.

iii. परंतु, तीव्र भाववाढीमुळे पैशांचे मूल्य कमी होते आणि खरेदीक्षमता घटते.

iv. तसेच, भाववाढीमुळे बचत व भांडवल उभारणी घटते. ही बाब, संयोजकांना उत्पादनातील जोखीम स्वीकारण्यासाठी नाउमेद करते.

v. याचा उत्पादनाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो.

vi. नफा मिळवण्यासाठी, जीवनावश्यक वस्तूंऐवजी सुखसोयीच्या वस्तूंच्या उत्पादनाकडे साधने वळविली जातात.

vii. भाववाढीमुळे विदेशी भांडवलाचा प्रवाह घटतो, कारण उत्पादनखर्च वाढल्यामुळे विदेशी गुंतवणूक कमी फायदेशीर ठरते.

***४. भाववाढीचे वितरणावर होणारे परिणाम स्पष्ट करा.**

उत्तर: i. भाववाढीमुळे समाजात उत्पन्न व संपत्तीचे असमान वितरण होते. ज्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत, तर गरीब अधिक गरीब होतात.

ii. संयोजक जास्त नफा कमावतात, कारण उत्पादन खर्चापेक्षा विक्री किमती वेगाने वाढतात.

iii. स्थिर उत्पन्न मिळवणाऱ्या निवृत्तिवेतनधारक, कामगार, पगारदार इत्यादींवर भाववाढीचा विपरीत परिणाम होतो, कारण त्यांचे पैशातील उत्पन्न स्थिर राहते; परंतु पैशाचे मूल्य कमी होते.

iv. जे लोक समभागांत (शेअर्स) भांडवल गुंतवणूक करतात त्यांचा किमती वाढल्यामुळे फायदा होतो.

v. याउलट, जे स्थिर उत्पन्न देणाऱ्या कर्जरोख्यांमध्ये व ठेवींमध्ये गुंतवणूक करतात त्यांचे नुकसान होते, कारण त्यांचे पैशांतील उत्पन्न स्थिर राहते.

vi. भाववाढीमुळे ऋणकोंना फायदा होतो, कारण ते कर्जफेड करताना पूर्वीपेक्षा कमी खरेदीशक्ती परत करतात; परंतु धनकोंचे नुकसान होते, कारण त्यांना वास्तव उत्पन्नाच्या स्वरूपात कमी उत्पन्न मिळते.

vii. भाववाढीच्या काळात मोठ्या शेतकऱ्यांचा फायदा होतो, कारण शेतमालाच्या किमती वाढतात.

viii. परंतु, छोट्या शेतकऱ्यांचा विशेष फायदा होत नाही, कारण उत्पादनाचा बराचसा भाग त्यांच्या स्वत:च्या उपभोगासाठी राखून ठेवला जातो.

५. 'भाववाढीचे अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम दिसून येतात'. या विधानाचे स्पष्टीकरण करा.

किंवा

भाववाढीचे आर्थिकेतर परिणाम कोणते आहेत?

[ऑक्टोबर १४, जुलै १६]

उत्तर: i. भाववाढीमुळे श्रीमंत व गरीब यांच्यातील दरी रुंदावते. त्यामुळे सामाजिक संघर्ष उद्‌भवतो.

ii. काही उद्योजक भेसळ, साठेबाजी, गुणवत्तेची घसरण इ. गोष्टींचा आधार घेतात. त्यामुळे भाववाढीचा नैतिक मूल्यांवर विपरीत परिणाम होतो.

iii. भाववाढीमुळे भ्रष्टाचार वाढतो व तो राजकीय अस्थिरतेत परावर्तित होतो.

iv. अशा प्रकारे, भाववाढीचे अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम दिसून येतात.

३.४ भाववाढीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना

६. भाववाढीला नियंत्रित ठेवणारे मौद्रिक उपाय सांगा.

[जुलै १६]

उत्तर: अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त पैशांचा पुरवठा कमी करणे हा मौद्रिक अधिकारांचा उद्देश असतो. त्यासाठी पुढील उपाय योजले जातात:

i. बँक दरात वाढ:

अ. बँक दर म्हणजे मध्यवर्ती बँक, व्यापारी बँकांना कर्जाऊ पैसे देताना आकारते, तो व्याजदर होय.

ब. बँक दरातील वाढ इतर व्याजदर वाढवते. ही वाढ लोकांना विविध वित्तसंस्थांकडून कर्ज घेण्याबाबत नाउमेद करते.

क. म्हणूनच, अर्थव्यवस्थेतील पैशांच्या पुरवठ्यात घट होते.

ii. खुल्या बाजारात सरकारी कर्जरोख्यांची विक्री: जेव्हा मध्यवर्ती बँक सरकारी कर्जरोख्यांची खुल्या बाजारात विक्री करते तेव्हा व्यापारी बँकांकडील रक्कम कमी होऊन अर्थव्यवस्थेतील पैशांचा पुरवठा कमी होतो.

iii. **ग्राहकांच्या कर्जाचे व्यवस्थापन:**

अ. गाडी, दूरदर्शन अशा टिकाऊ वस्तू विकत घेण्यासाठी व्यापारी बँका ग्राहकांना कर्ज देतात.

ब. पूर्वलक्षी भरणा करण्याच्या रकमेत वाढ करून आणि हप्त्यांची संख्या कमी करून कर्जाचे नियंत्रण केले जाते.

iv. **रोख निधीच्या प्रमाणात वाढ:**

अ. व्यापारी बँकांना त्यांच्या एकूण ठेवींपैकी जे प्रमाण मध्यवर्ती बँकेकडे ठेवावे लागते, त्यास रोख निधी प्रमाण म्हणतात.

ब. रोख निधीचे प्रमाण वाढवले, की बँकांकडून कमी कर्ज उपलब्ध होते.

क. त्यामुळे, पैशांचा पुरवठा नियंत्रणात राहण्यास मदत होते.

***७. भाववाढ नियंत्रित करण्याचे राजकोषीय उपाय स्पष्ट करा. [मार्च १४]**

उत्तर: भाववाढीच्या नियंत्रणासाठी राजकोषीय उपाय पुढीलप्रमाणे आहेत:

i. **सार्वजनिक खर्चात घट:**

भाववाढ रोखण्यासाठी सरकारी खर्चात कपात झाली पाहिजे.

ii. **करात वाढ (कर-वृद्धी):**

अ. शासन कर पातळी वाढवते आणि नवीन कर आकारते.

ब. त्यामुळे, लोकांच्या उपभोगखर्चात घट होते.

iii. **शिलकीचे अंदाजपत्रक:**

भाववाढ नियंत्रित करण्यासाठी सरकारला शिलकीचे अंदाजपत्रक स्वीकारावे लागते.

iv. **सार्वजनिक कर्ज:**

अ. सरकार बाजारातून, खाजगी व्यक्तींकडून व संस्थांकडून कर्ज घेते.

ब. यामुळे, लोकांची अतिरिक्त खरेदी शक्ती काढून घेतली जाते.

क. परिणामी, मागणी घटते व किमती उतरतात.

v. **ऊर्ध्वमूल्यन:**

ऊर्ध्वमूल्यनामुळे निर्यातीत घट होते व देशांतर्गत वस्तूंची उपलब्धता वाढते.

८. भाववाढीचे नियंत्रण करण्यासाठी प्रत्यक्ष उपाय सांगा. **[ऑक्टोबर १४]**

किंवा

***भाववाढ रोखण्याचे कोणतेही दोन प्रत्यक्ष उपाय लिहा.**

उत्तर: भाववाढीच्या नियंत्रणासाठी सरकारने योजलेले प्रत्यक्ष उपाय :

i. सतत वाढणारी मागणी पूर्ण करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनाचा विस्तार करणे.

ii. किमतींचे प्रत्यक्ष नियंत्रण व नियमन करणे. उदा. किमतीची उच्चमर्यादा, ज्याच्यापुढे किमती वाढवण्याची मान्यता नसते, ती खाली आणणे.

iii. उचित वेतन-नफा योजनेचा स्वीकार करणे.

iv. प्रसिद्धी मोहिमेद्वारे लोकांना खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन करणे.

v. लोकसंख्यावाढीचे नियंत्रण करणे.